## नियमित दिवाणी दावा क्र.१८३/२०२५ मधील
## निशाणी ३५ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दाखल करणेत आला असून वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे अशी मागणी केली आहे की, वादपत्रामध्ये अनावधानाने प्र.वादी क्र.३ यांचे नाव संभाजी रामचंद्र जाधव असे नमुद केले आहे. परंतू प्र.वादी क्र.३ यांना संभाजी उर्फ महेशकुमार रामचंद्र जाधव या नावाने देखील ओळखले जाते. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ यांच्या नावामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी वादी यांनी मागितलेली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जास नाहरकत दर्शविली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्र.वादी क्र.३ यांच्या नावामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. वादी क्र.३ यांचे संभाजी रामचंद्र जाधव असे नाव नमुद आहे. परंतू प्र.वादी क्र.३ यांचे संभाजी उर्फ महेशकुमार रामचंद्र जाधव असे नाव असून प्र.वादी क्र.३ यांचे नाव बदलण्याची आवश्यकता आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर फलिक न्यायनिर्णयाकरीता वादपत्रामध्ये बदल करण्याची आवश्यकता असेल तर तशी परवानगी देता येते. वादी मागत असलेली दरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायमस्वरुपी निर्णीत होणेकरीता मदत होणार आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून त्याच्या स्वरुपात देखील बदल होणार नाही. म्हणून वादी मागत असलेली दुरुस्ती म्हणजेच प्र.वादी क्र.३ संभाजी उर्फ महेशकुमार रामचंद्र जाधव यांचे असे नमुद करण्यास परवागी देणे न्यायोचित ठरते. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र.३५ मंजूर करणेत येतो.
२. वादी यांनी प्र.वादी क्र.३ यांच्या नावातील दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत करणेची आहे व दुरुस्तप्रत दाखल करणेची आहे.

PALLAVI MANSING SURYAWANSHI
Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2026.03.18 17:41:22 +0530

विटा
दिनांक : १८/०३/२०२६

(श्रीमती पल्लवी मा. सुर्यवंशी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, विटा